# महाराष्ट्र सहकारी सस्था अधिनियम 1960चे कलम 77 (अ) अंर्तगत आदेश

475

जा.कं.सनिमा / विनियम / जकास / प्रशा.मं.नि / / 2017
कार्यालय–सहायक निबंधक सहकारी संस्था मालेगांव
दिनांक : 30 / 06 / 2017

वाचा :–1. या कार्यालयाचे आदेश क.सनिमा / विनियम / जकास / 470 / 2016. दिनांक.24 / 2 / 2016
2. शासनाचे जा.कं.जंकास–1916 / प्र.क.98 / 9–स,दि.28 / 6 / 2017 चे पत्र
3. मा.सहकार आयुक्त व निबधक सहकारी संस्था, म.रा.पुणे याचे कायालयीन पत्र क. 16 / सआ / जंकासस / कवरदरी / सन 2017 / 135 दि.29 / 06 / 2017.
4. मा.जिल्हा उपनिबधक सहकारी संस्था,वाशिम.यांचे कार्यालयीन दुरध्वनी दि.30 / 6 / 2017.

ज्या अर्थी या कार्यालयाचे उक्त वाचा क.1 मधील नमुद दि.24 / 2 / 2016 च्या आदेशान्वये जंगल कामगार सहकारी संस्था,मर्या.कवरदरी र.न.319 ता.मालेगाव जि.वाशिम या संस्थेच्या संचालक मडळ सदस्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 73(क–अ) (1) (तीन) अर्तगत अपात्र घोषित केले असुन आदेशाचे तारखेपासुन संस्थेच्या संचालक मंडळ सदस्यांची पदे रिक्त झाली आहेत.

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77(अ)(ब–1) नुसार संस्थेच्या समितीने कार्यकरण्याचे बंद केले आहे.व व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली आहे. संस्थेच्या कारभारावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी संचालक मंडळा ऐवजी प्राधिकत अधिकारी श्री.पी.टी.सरकटे सहकार अधिकारी श्रेणी 1 व श्री.आर.एन.गरकळ सहकार अधिकारी श्रेणी 2 मालेगांव यांची नेमणुक केली.

उपरोक्त वाचा क.3 मधील नमुद पत्रान्वये शासनाने वाचा क.2 व 3 अन्वये मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,वाशिम यांनी सदर संस्थेवर शासनाचे सुचनेप्रमाणे प्रशासक मंडळ नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्याबाबत या कार्यालयास सुचित केले आहे. या कार्यालयास प्राप्त झालेल्या शासनाच्या व वरिष्ठ कार्यालयाच्या सुचनास अनुसरुन जंगल कामगार सहकारी संस्था,मर्या.कवरदरी र.न.319 ता. मालेगांव जि.वाशिम या संस्थेवर प्रशासकीय मंडळ नेमण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77 अ नुसार व महाराष्ट्र शासन सहकार व वस्त्रोद्योग विभाग शासन आदेश कं.सीएसएल / 1493 / 1162 / सी.आर.47 / 15–सी दि.7 / 8 / 1993 नुसार प्राप्त झालेल्या अधिकारात तसेच शासनाचे दि.28 / 6 / 2017 च्या सुचने नुसार जंगल कामगार सहकारी संस्था म.कवरदरी र.नं. 319 ता. मालेगांव जि.वाशिम या संस्थेवर खालील व्यक्तींचे प्रशासकिय मंडळ नियुक्त करण्यात येत आहे.

1.श्री.अनिल वसंतराव राठोड
2.श्री.तुळशिराम महादेव तायडे
3.श्री.शेषराव नामदेव पांडे

वरील प्रमाणे प्रशासकिय मंडळाची नियुक्ती शासनाच्या पुढील आदेशापर्यंत करण्यात येत असुन प्रशासकिय मंडळाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व संस्थेचे मंजुर उपविधी च्या तरतुदीस अधिन राहुन संस्थेने कामकाज करावे.

सदरचा आदेश आज दि.30 / 6 / 2017 रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत केला आहे.

(आर.एल.हिवाळे)
सहायक निबंधक
सहकारी संस्था मालेगांव

प्रति

1.श्री.पी.टी.सरकटे स.अ.श्रे.1मालेगांव तथा प्राधिकृत अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी वरील प्रमाणे नियुक्त प्राधिकृत अधिका–यांना संस्थेच्या रेकॉर्ड व मालमत्तेचा पदभार सुपुर्द करावा.
2.श्री.अनिल वसंतराव राठोड रा.कवरदरी ता.मालेगांव जि.वाशिम यांना आवश्यक कार्यवाही करीता.
3.श्री.तुळशिराम महादेव तायडे रा.कवरदरी ता.मालेगांव जि.वाशिमयांना आवश्यक कार्यवाही करीता.
4.श्री.शेषराव नामदेव पांडे रा.कवरदरी ता.मालेगांव जि.वाशिम यांना आवश्यक कार्यवाही करीता.

प्रतिलीपी

1. शाखा व्यवस्थापक,अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक शाखा किन्हीराजा / मालेगांव / सिव्हील लाईन अकोला यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.
2. प्रशासक / प्राधिकृत अधिकारी ,अकोला बुलढाणा जिल्हा जंगल कामगार सहकारी संस्थांचा संघ म. अकोला कौलखेड रोड ,वाढुरकर नगर अकोला

सहायक निबंधक
सहकारी संस्था मालेगांव

Rodage vibhag 3